**मार्गदर्शक सूचना-**

**जा.क्र.मृदसं२०१३/मृद व जलसंव/पुरस्कार/न.क्र.१४९/**
**मृद-३/ ४३८६/२०१३,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे ४११ ००१, दिनांक :- ३०/१२/२०१३.**

**प्रति,**

**१) जिल्हाधिकारी, (सर्व)**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

**विषयः-** **<u>महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार</u>**
**<u>जलसंधारण कामात उत्कृष्ट योगदानाबाबत बक्षिस योजना</u>**
**मार्गदर्शक सूचना .**

**संदर्भः-** शा.नि.क्र.मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १६ डिसेंबर २०१३.

राज्यातील कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगिण विकास करण्यासाठी मृद व जलसंधारण कार्यक्रम राज्यभरात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाव्दारे जमीनीची धूप थांबविणे, पाणलोटाच्या माथा ते पायथ्यामध्ये विविध उपचाराव्दारे अपधावेचे नियंत्रण करुन भूगर्भातील पाणी साठविणे, जमीनीचा पोत कायम राखून उत्पादनात वाढ करणे इत्यादि कार्यक्रम राज्यभरात हाती घेण्यात येत आहे. सदर उपक्रमात उत्कृष्ट काम करणा-या प्रयोगशील व्यक्ती/अशासकीयसंस्था/गाव/ग्रामपंचायत इत्यादिंचा गौरव करण्यासाठी बक्षिस योजनेस उपरोक्त शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आलेली असून, **महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार** या नावाने सदर पुरस्कार/बक्षिस देण्यात येणार आहे. या बक्षिस योजनेचे स्वरुप खालीलप्रमाणे.

**अ) वैयक्तिक स्वरुपाचा पुरस्कार :** जलसंधारण क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेले **शेतकरी/व्यक्ती/अशासकीय संस्था** या पुरस्कारासाठी पात्र राहतील. पात्रतेचे निकष **प्रपत्र-अ** मध्ये दिलेले आहेत. या पुरस्काराकरीता प्रत्येक जिल्हयातून एका व्यक्तीची अंतिम निवड करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या पुरस्कर्त्यास प्रत्येकी रोख रक्कम रुपये ७५०००/-(रुपये पंचाहत्तर हजार फक्त), स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

**ब) सामुदायिक स्वरुपाचा पुरस्कार :** जलसंधारण क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेले **गाव/ग्रामपंचायती/पाणलोट समिती/युवक मंडळ/गट** या पुरस्कारासाठी पात्र राहतील. पात्रतेचे निकष **प्रपत्र-अ** मध्ये दिलेले आहेत. या पुरस्काराकरीता प्रत्येक जिल्हयातून वरीलपैकी एकाची अंतिम निवड करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या पुरस्कर्त्यास प्रत्येकी रोख रक्कम रुपये ०२.५० लाख ( रुपये दोन लाख पन्नास हजार फक्त), स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

**क) अधिकारी/कर्मचारी यांच्याकरीताचा पुरस्कार :** मृद व जलसंधारण विभागाच्या विविध योजनेची यशस्वी अंमलबजावणी केलेल्या व स्वतःच्या कल्पकतेचा वापर करुन गावांतील पाणलोटाचा कायापालट करणा-या **अधिकारी/कर्मचा-यांना** हा पुरस्कार देण्यात येईल. या पुरस्कार निवडीचे निकष **प्रपत्र-ब** मध्ये दिलेले आहे.

या योजनेत सहभागी होण्यासाठी शुल्क आकारण्यात येणार नाही. या योजनेची वेगवेगळया माध्यमाव्दारे प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी. प्राप्त झालेल्या नामनिर्देशन अर्जावर शिफारशी करण्याच्या अगोदर संबंधित कार्यक्षेत्रातील अधिका-याने त्यांच्या कामाची प्रत्यक्ष पाहणी करावी. तद्‌नंतर जिल्हास्तरीय निवड समितीकडे अर्ज पाठविण्यात यावा.

**अ) जिल्हास्तरीय निवड समिती:**

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा परिषद) | - | सह अध्यक्ष |
| ३) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा परिषद) | - | सदस्य |
| ४) कार्यकारी अभियंता ( लघुसिंचन) | - | सदस्य |
| ५) उप संचालक सामाजिक वनीकरण | - | सदस्य |
| ६) वरीष्ठ भूवैज्ञानिक (जी.एस.डी.ए.) | - | सदस्य |
| ७) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य सचिव |

१) सदर समितीमार्फत प्रपत्र - अ प्रमाणे प्राप्त अर्जाची छाननी आणि पाहणी करण्यात येईल. तद्‌नंतर **वैयक्तिक स्वरुपाच्या आणि सामुदायिक स्वरुपाच्या पुरस्कारासाठी प्रत्येकी तीन पुरस्कर्त्यांची** निवड करुन अंतिम निवडीसाठी राज्यस्तरीय समितीकडे शिफारस करण्यात येईल.

**ब) राज्यस्तरीय समिती:**

| | | |
|---|---|---|
| १) मा. मंत्री (जलसंधारण) | - | अध्यक्ष |
| २) मा. राज्यमंत्री (जलसंधारण) | - | उपाध्यक्ष |
| ३) मा.प्रधान सचिव (जलसंधारण) | - | सदस्य |
| ४) मा. अपर मुख्य सचिव (कृषि) | - | सदस्य |
| ५) मा. प्रधान सचिव (ग्राम विकास) | - | सदस्य |
| ६) मा. आयुक्त, (कृषि) | - | सदस्य |
| ७) उपसचिव ( जलसंधारण) | - | सदस्य |
| ८) मुख्य अभियंता लघुपाटबंधारे ( लघुसिंचन) | - | सदस्य |
| ९) संचालक, सामाजिक वनीकरण | - | सदस्य |
| १०) संचालक, (जी.एस.डी.ए) | - | सदस्य |
| ११) संचालक, मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन. | - | सदस्य सचिव. |

२) जिल्हास्तरीय समितीकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व सोबतच्या अर्जाची छाननी राज्यस्तरीय समिती मार्फत करण्यात येईल. छाननी झाल्यानंतर राज्यस्तरीय समितीमार्फत **वैयक्तिक स्वरुपाच्या आणि सामुदायिक स्वरुपाच्या पुरस्कारासाठी प्रत्येकी एक** याप्रमाणे प्रत्येक जिल्हयातील निवडलेल्या पुरस्कर्त्यांची नावे घोषित करण्यात येतील.

**क) अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता पुरस्कार :**

मृद व जलसंधारणाच्या विविध योजनाच्या यशस्वीरित्या अंमलबजावणी केलेल्या तसेच स्वतःच्या कल्पकतेचा वापर करुन त्या गाव/पाणलोटाचा कायापालट होण्याच्या दृष्टीने योजनांची अंमलबजावणी केलेली असल्यास अशा **अधिकारी / कर्मचारी** यांना पुरस्कार देण्यात येईल.अधिकारी/कर्मचारी यांचे निवडीचे सर्वसाधारण निकष **प्रपत्र-ब** मध्ये दर्शविलेले आहे. **अधिकारी किंवा कर्मचारी यांच्यापैकी प्रती जिल्हा दोन** याप्रमाणे निवड करुन जिल्हास्तरीय निवड अधिकारी यांनी विभागीय कृषि सह संचालक यांचेकडे प्रस्ताव सादर करावेत. विभागीय कृषि सह संचालक यांनी सदर प्रस्तावाची छाननी करुन पात्र असणारा अधिकारी/कर्मचारी यांचे प्रस्ताव सरळरित्या शासनाकडे पाठवावेत. सदरचे प्रस्ताव तपासून अंतिम निवडीचे अधिकार शासनास राहतील.

वरीलप्रमाणे निवडीच्या निकषाची **प्रपत्र अ व ब** ची प्रत सोबत सहपत्रीत केलेली आहे.

**३) पुरस्काराचे स्वरुप खालीलप्रमाणे राहील :**

| अ.क्र. | पुरस्कार्थी | प्रति जिल्हा संख्या | प्रति पुरस्कार्थी बक्षिसाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| १ | **अ) वैयक्तिक स्वरुपाचा पुरस्कार** - शेतकरी/व्यक्ती/अशासकीय संस्था | ०१ | रक्कम रु. ७५०००/- व स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र |
| २ | **ब) सामुदायिक स्वरुपाचा पुरस्कार :** गाव/ ग्रामपंचायती/पाणलोट समिती / युवक मंडळ/गट | ०१ | रक्कम रु. ०२.५० लक्ष व स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र |
| ३ | **क) अधिकारी/कर्मचारी यांचेकरीता पुरस्कार** | ०२ | स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र |

४) बक्षिसासाठी व बक्षिस वितरणाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक निधी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून करण्यात येईल. बक्षिस वितरणाचा कार्यक्रम राज्यस्तरावर एकत्रितपणे आयोजित करण्यात येईल. बक्षिसाची रक्कम धनाकर्षाव्दारे देण्यात येईल.

वरीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमीत करण्यात येत असून, त्या अनुषंगाने कळविण्यात येते की, वैयक्तिक स्वरुपाच्या आणि सामुदायिक स्वरुपाच्या पुरस्कारासाठी प्रत्येकी तीन पुरस्कर्त्यांची निवड करुन अंतिम निवडीसाठीचा प्रस्ताव राज्यस्तरीय समितीच्या शिफारशी करीता खास दूतामार्फत **दिनांक ७ फेब्रुवारी २०१४ पूर्वी** या कार्यालयास सादर करावा. सोबत वरील संदर्भिय शासन निर्णयाची प्रत सहपत्रीत करण्यात येत आहे.

**सोबतः- वरीलप्रमाणे प्रपत्र अ व ब,**
**तसेच शा.नि.प्रत.**

**स्वाक्षरीत/-**
**संचालक,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे-१**

**प्रतः-** उप सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, (जल-८) मंत्रालय, मुंबई ३२ यांना वरील संदर्भान्वये माहितीस्तव सादर.

**प्रतः-** विभागीय कृषि सह संचालक, (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी. (सोबतः-वरीलप्रमाणे).

## प्रपत्र-अ

१. नाव व संपुर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांक) –
२. तालुका-
३. जिल्हा-
४. कार्यक्षेत्र-
५. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो –
६. व्यक्तीगत स्वरुपाचा पुरस्कार असल्यास चारित्र्याचा दाखला –
७. पुरस्कार निवडीचे निकष-

### अ) व्यक्ती :-

१. १८ ते ६० वर्षातील असावी.
२. स्वतःच्या पडीक जमीनीवर सीसीटी, ओघळीवर ओघळ नियंत्रण, वृक्ष लागवड, इत्यादि उपचार केलेले असावेत.
३. स्वतःच्या जमीनीवर बांधबंदीस्ती करुन कोरडवाहू शेतीचा विकास केलेला असावा.
४. मुलस्थानी जलसंधारण, विहीर पुनर्भरण, श्रमदानातून वनराई बंधारे, आणि जलस्त्रोतातील गाळ टाकून जमीन लागवडीखाली आणलेली असावी.
५. कमी पाण्यामध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेणा-या पध्दतीचा स्विकार केलेला असावा.
६. शेततळे अथवा इतर कोणत्याही पध्दतीची उपचार पध्दत अंगीकारलेली असावी.
७. जलसंधारण विभागामार्फत आयोजित परिसंवादात सहभाग नोंदविलेला असावा.
८. जलसंधारण विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजनेंतर्गत सक्रिय सहभाग असावा.
९. जलसंधारण कामात पारितोषिक /पुरस्कार प्राप्त झालेला असावा.
१०. पिण्याच्या पाण्याच्या उभ्दव वाढीसाठी व शेतीच्या पाण्याची काटकसर करण्यासाठी प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून जनजागृती केलेली असावी.
११. एकदा पुरस्कार दिल्यानंतर सदर व्यक्तीचा पुढील ०५ वर्षाकरीता पुरस्कारासाठी विचार करण्यात येऊ नये.
१२. पुरस्कारास पात्र ठरलेली व्यक्ती गुन्हेगार प्रवृत्तीची असू नये.
१३. पुरस्कार प्राप्त व्यक्तीची नावे/संस्थेचे नाव कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावीत.

### ब) संस्था :-

१. संस्था नोंदणीकृत असावी.
२. मृद व जलसंधारण कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.
३. कायमस्वरुपी तांत्रिक मनुष्यबळ असावे.
४. लेखा परिक्षण झालेले असावे.
५. लोकसहभागाव्दारे कामे केल्याची नोंद असावी.
६. विकास निधीच्या माध्यमातून/लोकसहभागातून जलस्त्रोतांची देखभाल, दुरुस्ती सारखी कामे केलेली असावी.
७. संस्थेच्या मालकीच्या जमीनीवर मृद व जलसंधारणाची प्रेरणादायी कामे जनतेस खुली केलेली असावीत.
८. भूमिहीनासाठी उपक्रमाव्दारे उपजिविकेचे कायमस्वरुपी साधन निर्माण करुन दिलेले असावे.
९. सामूहिक क्षेत्रावर वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन, पिण्याच्या पाण्याच्या उभ्दव वाढीसाठी व शेतीच्या पाण्याची काटकसर करण्यासाठी प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून जनजागृती केलेली यशोगाथा असावी.
१०. महिलांचा सहभाग असावा.
११ संस्थेचा काळया यादीत समावेश झालेला नसावा.

### क) सामुदायिक स्वरुपाचे पुरस्कार :-

**गाव/पाणलोट समिती/ग्रामपंचायत/युवक मंडळ/गट**

१. विविध योजनेतून मिळालेल्या निधीचे लेखा परिक्षण झालेले असावेत व अभिलेख अद्यावत असावेत.

२. ग्राम पंचायत क्षेत्राचे वॉटर बजेटींग केलेले असावेत.

३. सार्वजनिक व वैयक्तिक विहीरींचे पुनर्भरण केलेले असावेत.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत मृद व जलसंधारणाची कामे करुन जास्तीत जास्त मनुष्य दिवस निर्मिती केलेली असावी.

५. केलेल्या कामांचे सामाजिक अंकेक्षण केलेले असावे.

६. मृद व जलसंधारणाच्या कामामध्ये लोकसहभाग असावा.

७. सामुहिक क्षेत्रावर वृक्ष लागवड व संवर्धन केलेले असावे.

८. झालेल्या उपचारांची देखभाल व दुरुस्ती केलेली असावी.

९. पाणी पुरवठयांच्या स्त्रोतांचे बळकटीकरण केलेले असावे.

१०. पारितोषिक व पुरस्कार प्राप्त झालेला असावा.

११. युवकांचा गट असल्यास तो नोंदणीकृत असावा.

१२. स्थापन केलेला गट हा कायमस्वरुपी असावा व नियमित बैठका झालेल्या असाव्यात.

१३. गटामध्ये सर्वसमावेशक प्रतिनिधींचा (अनु.जा/जमाती/अल्प/अत्यल्प व महिला) समावेश असावा.

१४. गटाच्या कार्यक्षेत्रात भूजलांतील पाण्याची पातळी वाढण्याचे दृष्टीने विविध उपचार (विहीर पुनर्भरण/ वनराई बंधारे, मुलस्थानी जलसंधारण) लोकसहभागातून व श्रमदानातून राबविलेले असावेत.

१५. कृषि विभागामार्फत राबविल्या जाणा-या विविध उपक्रमामध्ये सहकार्य भावनेतून सहभाग असावा.

**प्रपत्र-ब**

**अधिकारी/कर्मचारी यांचे निवडीचे निकष :-**

१. सेवा कालावधी किमान ५ वर्ष असावा.

२. मृद व जलसंधारण बाबतचे प्रशिक्षण झालेले असावे.

३. मृद व जलसंधारणाची कामे करताना लोकसहभाग मिळविण्याच्या दृष्टीने सक्षम असावा.

४. कामे करताना उद्योगप्रियता, कार्यतत्परता तसेच इतरांशी सौजन्य किंवा सहकार्याचे संबंध ठेवणारा असावा.

५. मृद व जलसंधारणाची कामे करताना निर्णय शक्ती, उपक्रमशिलता यासह कार्यक्षम असावा.

६. उत्कृष्ट कामे केल्या संदर्भात यशोगाथा प्रसिध्द केलेल्या असाव्यात.

७. कृषि विभागामार्फत घेण्यात येणा-या विविध प्रशिक्षणात व चर्चासत्रात सक्रिय सहभाग असावा.

८. सेंद्रिय शेती, शेतकरी मासिक, मृद व पाणी परिक्षण इ. उपक्रमात लोकसहभाग वाढविण्याच्या दृष्टीने प्रयत्न केलेले असावेत.

९. स्वतःचे कल्पकतेतून नाविन्यपूर्ण बाबीचा उपक्रम राबविलेला असावा.

१०. अधिकारी/कर्मचारी यांच्या पुढाकराने एखादया गावाचा पिण्याच्या पाण्याचा किंवा शेतीचा पाण्याचा प्रश्न पूर्णतः किंवा अंशतः सुटलेला असावा.

**<u>शुध्दीपत्रक</u>**

**जा.क्र.मृदसं२०१३/मृद व जलसंव/पुरस्कार/न.क्र.१४९/**
**मृद-३/ ४९ /२०१४,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे ४११ ००१, दिनांक :- ८/१/२०१४.**

**प्रति,**

**१) जिल्हाधिकारी, (सर्व)**

**२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व)**

**विषयः- <u>महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार</u>**
**<u>जलसंधारण कामात उत्कृष्ट योगदानाबाबत बक्षिस योजना</u>**
**मार्गदर्शक सूचना - शुध्दीपत्रक**

**संदर्भः- १)** शा.नि.क्र.मफुअ-२०१३/प्र.क्र.३७/जल-८, जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२, दिनांक १६ डिसेंबर २०१३.
२) आयुक्तालयाचे वरील समक्रमांकीय पत्र क्र. ४३८६ दिनांक ३०/१२/२०१३.

उपरोक्त विषयानुसार महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्काराच्या शासन निर्णयाच्या अनुषंगाने निर्गमीत केलेल्या वरील संदर्भ क्र. २ च्या मार्गदर्शक सूचनांचे कृपया अवलोकन व्हावे. सदर मार्गदर्शक सूचनांमधे मुद्दा क्र. ३ मधील पुरस्काराचे स्वरुप या मुद्यांच्या विवरणातील रकाना क्र. (क) मध्ये **अधिकारी/कर्मचारी** यांचे पुरस्काराकरीता प्रति जिल्हा निवडीची संख्या १ दर्शविली गेलेली आहे. तरी कृपया सदर निवडीची **<u>प्रति जिल्हा २</u>** अशी संख्या वाचावी, ही विनंती.

**स्वाक्षरीत/-**
**कृषि उप संचालक,(भूवि)**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे-४११ ००१.**

**प्रतः-** विभागीय कृषि सह संचालक, (सर्व) यांना माहिती व आवश्यक त्या तात्काळ कार्यवाहीसाठी.

सुरेश अंबुलगेकर,
संचालक, मृद संधारण

अ.शा.पत्र.क्र.मृदसं-२०१४/मफुजपु/बक्षिसयो/न.क्र.४/
मृद-३/ ९५४ /२०१४,
मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे ४११ ००१, दिनांक :- ५/६ /२०१४

**विषयः- महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार**
**जलसंधारण कामात उत्कृष्ट योगदानाबाबतच्या बक्षिस योजनासाठी**
**पुरस्काराचे प्रस्ताव पाठविणेबाबत.**

**प्रिय श्री./डॉ.**

उपरोक्त विषयाकिंत कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र. ४३८६, दिनांक ३०/१२/२०१३ अन्वये निर्गमीत केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे कृपया अवलोकन करावे. मृद व जलसंधारण कार्यक्रम राबविण्याच्या उपक्रमात उत्कृष्ट काम करणा-या प्रयोगशील व्यक्ती/अशासकीयसंस्था/गाव/ग्रामपंचायत इत्यादिंचा गौरव करण्यासाठी बक्षिस योजनेंतर्गत या महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कारास शासनाने दिनांक १६/१२/२०१३ च्या शासन निर्णयान्वये सन २०१३-१४ मध्ये मान्यता दिलेली असल्याने उक्त पत्रान्वये मार्गदर्शक सूचनांनुसार आपणाकडून सदर पुरस्काराचे प्रस्ताव मागविण्यात आले होते.

सदर बक्षिस योजना सन २०१४-१५ या वर्षात कायम करुन, वरील दिनांक १६.१२.२०१३ चा शासन निर्णय सन २०१४-१५ मध्ये सुध्दा लागू केलेला आहे. तसेच सदर महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार लवकरात लवकर जुलै २०१४ मध्ये देण्याचे शासनस्तरावर प्रस्तावित/विचाराधीन आहे.

तरी त्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, वरील दिनांक ३०.१२.२०१३ च्या मार्गदर्शक सूचनांप्रमाणे वैयक्तिक, सामुदायिक व अधिकारी / कर्मचारी यांचेकरीताच्या पुरस्कारांसाठीचे प्रस्ताव **दिनांक १५ जून २०१४** पर्यंत आयुक्तालयास सादर करावेत, म्हणजे सदर प्रस्ताव अंतिम निवडीसाठी राज्यस्तरीय समितीच्या शिफारशी करीता शासनास वेळेत सादर करता येतील.

**आपला**
**स्वाक्षरीत/-**
**( सुरेश अंबुलगेकर )**

**श्री./डॉ.**
**विभागीय कृषि सह संचालक, (सर्व)**

**प्रतः-** जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, (सर्व) यांना माहिती व तात्काळ कार्यवाहीसाठी.
**प्रतः-** श्री. शं. त्र्यं. जाधव, अवर सचिव, महाराष्ट्र शासन, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ३२ यांना शासनाचे पत्र क्र. मफुअ-२०१४/प्र.क्र.५४/जल-८, दिनांक २२ मे २०१४ अन्वये माहितीस्तव सादर.

स्वाक्षरीत/-
**संचालक,**
**मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन,**
**कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,**
**पुणे ४११ ००१.**

महात्मा ज्योतिबा फुले जलमित्र पुरस्कार : जलसंधारण कामात उत्कृष्ट योगदानाबाबत बक्षीस योजनेस मंजुरी देणेबाबत...

## महाराष्ट्र शासन

### जलसंधारण विभाग

### शासन निर्णय क्रमांकः मफुअ-२०१३/प्र. क्र. ३७ /जल-८

मंत्रालय , मुंबई -४०००३२

तारीख: १६ डिसेंबर, २०१३

**वाचा -**

**शासन निर्णय, ग्राम विकास व जलसंधारण विभाग**

१) **क्रमांक : जलसं-२००२/प्र.क्र.५८१/जल-७, दिनांक २८ फेब्रुवारी,२००२**

२) **क्रमांक : जलसं-२००२/प्र.क्र६७०/जल-७, दिनांक २९ नोव्हेंबर,२००२**

३) **क्रमांक : जलसं-१००३/प्र.क्र .७९/जल-८, दिनांक १८ जून,२००३**

४) **क्रमांक : जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, दिनांक १० सप्टेंबर,२००८**

५) **क्रमांक : जलसं-२००८/प्र.क्र.३१/जल-८, दिनांक २० फेब्रुवारी, २००९**

६) **क्रमांक : जलसं-२०११/प्र.क्र.१६ /जल-८, दिनांक ३० मार्च, २०११**

७) **क्रमांक : जलसं-२०११/प्र.क्र.६५ /जल-८, दिनांक ०३ फेब्रुवारी, २०११**

८) **क्रमांक : शुध्दीपत्रक जलसं-२०११/प्र.क्र.६५ /जल-८, दिनांक ०७ मार्च २०१२**

**प्रस्तावना -**

राज्यातील ग्रामीण भागातील जल व भूमी संधारण, पडीक जमीन विकास, वृक्ष लागवड इत्यादी नैसर्गिक साधन संपत्तीत सुधारणा व वाढ करण्याच्या दृष्टीने स्थानिक स्वराज्य संस्था, स्वयंसेवी संस्था तसेच ग्रामीण भागातील जनतेचा लोक सहभाग या माध्यमाद्वारे महात्मा ज्योतिबा फुले जल व भुमी संधारण अभियान दिनांक १ मे, २००२ पासून संदर्भाधिन दिनांक २८ फेब्रुवारी, २००२ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यास सुरूवात झाली. जलसंधारण कार्यक्रमाला गती देण्यासाठी अभियान काळात केलेल्या चांगल्या कार्याचा गौरव व्हावा या उद्देशाने जिल्हा परिषदा, पंचायत समित्या, ग्रामपंचायत, सेवाभावी संस्था यांना पुरस्कार देण्यासाठी संदर्भाधीन दिनांक १८ जून, २००३ च्या शासन निर्णयान्वये बक्षीस योजना जाहीर करण्यात आली आहे. तथापि या योजनेस मिळालेला सौम्य प्रतिसादामुळे त्याचे स्वरुप बदलून व्यापक / सुधारित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## शासन निर्णय -

राज्यातील पाण्याची उपलब्धता व वारंवार येणारी दुष्काळ सदृश परिस्थिती विचारात घेता जलसंवर्धनाच्या कार्यक्रमास अनन्यसाधारण महत्व प्राप्त आहे. महाराष्ट्रातील जवळ जवळ ८० टक्के क्षेत्र कोरडवाहू असून पर्जन्यधारीत आहे. राज्यातील सिंचन क्षमतेस मर्यादा आल्याने विविध स्त्रोताद्वारे पाण्याचा पुरेपूर उपयोग केल्यास कमाल २८ टक्के क्षेत्र ओलीताखाली येऊ शकते. त्यामुळे कोरडवाहू क्षेत्रावर अवलंबून असलेल्या जनतेस अनिश्चित व अपु-या पर्जन्यवृष्टीमूळे आर्थिक संकटास आणि पाणी टंचाईस सामोरे जावे लागत आहे. यासाठी राज्यातील कोरडवाहू क्षेत्राचा सर्वांगीण विकास करण्यासाठी मृद व जलसंधारण कार्यक्रम राज्यात राबविण्यात येत आहे. या कार्यक्रमाद्वारे जमिनीची धूप थांबवणे, पाणलोटाच्या माथा ते पायथ्यामध्ये विविध उपचाराद्वारे अपधावेचे नियंत्रण करुन भूगर्भातील पाणी साठवणे, जमिनीचा पोत कायम राखून उत्पादनात वाढ करणे इत्यादी उपक्रम हाती घेण्यात येत आहेत. सदर उपक्रमात उत्कृष्ट काम करणा-या प्रयोगशील व्यक्ती / संस्था / गाव / ग्रामपंचायत इत्यादींचा गौरव करण्यास या शासन निर्णयान्वये शासन मान्यता देण्यात येत आहे. या बक्षीस योजनेचे स्वरुप खालील प्रमाणे आहे.

अ. वैयक्तिक स्वरूपाचा पुरस्कार : जलसंधारण क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेले शेतकरी / व्यक्ती / अशासकीय संस्था या पुरस्कारासाठी पात्र राहतील. पात्रतेचे निकष "प्रपत्र- अ" मध्ये दिलेले आहेत. या पुरस्काराकरिता प्रत्येक जिल्ह्यातून एका व्यक्तीची अंतीम निवड करण्यात येईल अंतिम निवड झालेल्या पुरस्कर्त्यास प्रत्येकी रोख रक्कम रु.७५०००/- (रुपये पंचाहत्तर हजार फक्त) स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

ब. सामुदायिक स्वरूपाचा पुरस्कार : जलसंधारण क्षेत्रात उत्कृष्ट काम केलेले गाव / ग्रामपंचायती / पाणलोट समिती / युवक मंडळ/ गट या पुरस्कारासाठी पात्र राहतील. पात्रतेचे निकष प्रपत्र- अ मध्ये दिलेले आहेत. या पुरस्काराकरिता प्रत्येक जिल्ह्यातून एकाची अंतिम निवड करण्यात येईल. अंतिम निवड झालेल्या पुरस्कर्त्यास प्रत्येकी रोख रक्कम रु. ०२.५० (रुपये दोन लक्ष पन्नास हजार फक्त), स्मृतीचिन्ह आणि प्रशस्तीपत्र देण्यात येणार आहे.

क. अधिकारी / कर्मचारी यांच्याकरीताचा पुरस्कार : मृद व जलसंधारण विभागाच्या विविध योजनेची यशस्वी अंमलबजावणी केलेल्या व स्वत:च्या कल्पकतेचा वापर करुन गावांतील पाणलोटाचा

कायापालट करणा-या अधिकारी / कर्मचा-यांना हा पुरस्कार देण्यात येईल. या पुरस्कार निवडीचे निकष "प्रपत्र- ब" मध्ये दिलेले आहेत.

या योजनेत सहभागी होण्यासाठी शुल्क आकारण्यात येणार नाही. या योजनेची वेगवेगळ्या माध्यमाद्वारे प्रचार व प्रसिध्दी करण्यात यावी. प्राप्त झालेल्या नामनिर्देशन अर्जावर शिफारसी करण्याअगोदर सबंधीत कार्यक्षेत्रातील अधिका-याने त्यांच्या कामाची प्रत्यक्ष पहाणी करावी. तद्‌तर जिल्हास्तरीय निवड समितीकडे अर्ज पाठवण्यात यावा.

अ) जिल्हास्तरीय निवड समिती :

| | | |
|---|---|---|
| १) जिल्हाधिकारी | - | अध्यक्ष |
| २) मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा परिषद) | - | सह अध्यक्ष |
| ३) अतिरीक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, (जिल्हा परिषद) | - | सदस्य |
| ४) कार्यकारी अभियंता (लघु सिंचन) | - | सदस्य |
| ५) उपसंचालक सामाजिक वनीकरण | - | सदस्य |
| ६) वरीष्ठ भूवैज्ञानिक (जी.एस.डी.ए.) | - | सदस्य |
| ७) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी | - | सदस्य सचिव |

सदर समितीमार्फत प्रपत्र - अ प्रमाणे प्राप्त अर्जाची छाननी आणि पाहणी करण्यात येईल. तद्‌तर वैयक्तिक स्वरूपाच्या आणि सामुदायीक स्वरूपाच्या पुरस्कारासाठी प्रत्येकी तीन पुरस्कर्त्यांची निवड करुन अंतिम निवडीसाठी राज्यस्तरीय समितीकडे शिफारस करण्यात येईल.

ब. राज्यस्तरीय समिती

| | | |
|---|---|---|
| १. मा.मंत्री (जलसंधारण) | - | अध्यक्ष |
| २. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) | - | उपाध्यक्ष |
| ३. प्रधान सचिव (जलसंधारण) | - | सदस्य |
| ४. अपर मुख्य सचिव (कृषि) | - | सदस्य |
| ५. प्रधान सचिव (ग्राम विकास) | - | सदस्य |
| ६. आयुक्त (कृषि) | - | सदस्य |
| ७. उपसचिव (जलसंधारण) | - | सदस्य |

८. मुख्य अभियंता लघुपाटबंधारे (लघु सिंचन) - सदस्य

९. संचालक, सामाजिक वनीकरण - सदस्य

१०. संचालक, जी.एस.डी.ए. - सदस्य

११. संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन - सदस्य सचिव

२. जिल्हास्तरीय समितीकडून प्राप्त झालेल्या शिफारशी व सोबतच्या अर्जांची छाननी राज्यस्तरीय समितीमार्फत करण्यात येईल. छाननी नंतर राज्यस्तरीय समितीमार्फत वैयक्तिक स्वरूपाच्या आणि सामुदायीक स्वरूपाच्या पुरस्कारासाठी प्रत्येकी एक प्रमाणे प्रत्येक जिल्ह्यातील निवडलेल्या पुरस्कर्त्यांची नावे घोषीत करण्यात येतील.

**अधिकारी/ कर्मचारी यांचेकरीता पुरस्कार :**

मृद व जलसंधारणाच्या विविध योजनाच्या यशस्वीरीत्या अंमलबजावणी केलेल्या तसेच स्वत:च्या कल्पकतेचा वापर करून त्या गाव / पाणलोटाचा कायापालट होण्याच्या दृष्टीने योजनांची अंमलबजावणी केलेली असल्यास अशा अधिकारी/कर्मचारी यांना पुरस्कार देण्यात येईल. अधिकारी /कर्मचारी यांचे निवडीचे सर्वसाधारण निकष प्रपत्र ब मध्ये दर्शविले आहे. अधिकारी / कर्मचारी यांची प्रती जिल्हा दोन याप्रमाणे निवड करून जिल्हास्तरीय निवड अधिकारी यांनी विभागीय कृषि सहसंचालक यांचेकडे प्रस्ताव सादर करावे. विभागीय कृषि सहसंचालकांनी सदर प्रस्तावांची छाननी करून पात्र असणारा अधिकारी/कर्मचारी यांचे प्रस्ताव सरळरीत्या शासनाकडे पाठववेत. सदरचे प्रस्ताव तपासून अंतिम निवडीचे अधिकार शासनास राहतील.

३. पुरस्काराचे स्वरूप खालीलप्रमाणे राहील:

| अ.क्र | पुरस्कार्थी | प्रति जिल्हा संख्या | प्रति पुरस्कार्थी बक्षिसाचे स्वरूप |
|---|---|---|---|
| ०१ | व्यक्तीगत पुरस्कार-<br>अ) शेतकरी/व्यक्ती/अशासकीय संस्था | ०१ | रक्कम रु.७५०००/- व स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र |
| ०२ | ब) सामुदायिक स्वरूपाचा पुरस्कार- गाव ग्रामपंचायत / पाणलोट समिती/युवकाचा गट | ०१ | रक्कम रु. ०२.५० लक्ष व स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र |
| ०३ | अधिकारी/ कर्मचारी यांचेकरीता पुरस्कार | ०१ | स्मृतिचिन्ह आणि प्रशस्तीपत्र |

४. बक्षीसासाठी व बक्षीस वितरणाच्या कार्यक्रमासाठी आवश्यक निधी सन २०१३-१४ या आर्थिक वर्षात उपलब्ध असलेल्या तरतूदीतून देण्यात येईल. बक्षीस वितरणाचा कार्यक्रम राज्यस्तरावर एकत्रितपणे आयोजित करण्यात येईल. बक्षीसाची रक्कम धनाकर्षाद्वारे देण्यात येईल.

५. मृद व जलसंधारण कामात उत्कृष्ट योगदानाबाबत वैयक्तिक व सामुदायीक स्वरुपाच्या बक्षीस योजनेअंतर्गत वरील पुरस्कारासाठी करण्यात येणारा खर्च खालील लेखाशिर्षांतर्गत मंजूर केलेल्या निधीतून करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे. "मागणी क्र.एल-७, ४४०२-मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च १०२-मृदसंधारण-(०१) राज्य योजना-पंचवार्षिक योजनांतर्गत योजना (०१)(२१) पाणलोट विकास चळवळ, प्रसिध्दी व पारितोषिक याजना (४४०२ २३५१) ०५, बक्षिसे".

६. हा शासन निर्णय नियोजन व वित्त विभागाचा अनौपचारिक क्रमांक ६०१/२०१३, दिनांक ६ डिसेंबर, २०१३ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३१२१६१०५९१५४१२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**(सुनील चव्हाण)**

**उप सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. मा. राज्यपाल यांचे सचिव,

२. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव,

३. मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव

४. मा. विरोधी पक्षनेते, विधानसभा / विधानपरिषद महाराष्ट्र विधानमंडळ मुंबई

५. सर्व सन्माननिय संसद सदस्य व विधानसभा / विधानपरिषद

६. मा. मंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव

७. मा. राज्यमंत्री (जलसंधारण), यांचे खाजगी सचिव

८. सर्व मा. मंत्री / मा. राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव

९. मुख्य सचिव यांचे स्वीय सहाय्यक,

१०.सर्व अप्पर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,

११.महासंचालक, माहिती व जनसंपर्क (प्रसिध्दीकरीता),

१२. सर्व विभागीय आयुक्त,

१३.आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.

१४.कार्याध्यक्ष, आदर्शगाव संकल्प व प्रकल्प समिती, पुणे.

१५. प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक सामाजिक वनीकरण महाराष्ट्र राज्य, पुणे.

१६.मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा.

१७.अपर मुख्य कार्यकारी अधिकारी वसुंधरा राज्यस्तरीय पाणलोट विकास यंत्रणा

१८. प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर,

१९.महासंचालक, यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण संस्था, पुणे,

२०.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, महाराष्ट्र राज्य,पुणे

२१.मुख्य अभियंता,लघु पाटबंधारे (स्थानिक स्तर),पुणे

२२.संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे,

२३.संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर,

२४.कुलगुरु, महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहूरी, जिल्हा अहमदनगर, मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी / पंजाबराव कृषि विद्यापीठ, अकोला. कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

२५.सर्व जिल्हाधिकारी,

२६.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, / सर्व अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,

२७.सर्व सहसंचालक, कृषि आयुक्तालय, पुणे

२८. सर्व सहसंचालक, (सामाजिक वनीकरण ),

२९.सर्व विभागीय कृषि सहसंचालक,

३०.सर्व अधीक्षक अभियंता, पाटबंधारे,/सर्व अधीक्षक अभियंता, लघु पाटबंधारे,(स्थानिक स्तर)

३१.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई,/महासंचालक, माहिती व जनसंपर्क, मुंबई (प्रसिध्दी करीता),

३२.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी,

३३.सर्व मुख्य वन संरक्षक व उप महासंचालक,सामाजिक वनीकरण वृत्ते,

३४.सर्व मुख्य वनसंरक्षक, / सर्व उपवनसंरक्षक,

३५.सर्व उपसंचालक,सामाजिक वनीकरण.

३६.सर्व उपायुक्त (विकास),

३७.ग्रंथपाल, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.

३८. महालेखापाल — १ / २, महाराष्ट्र राज्य ,मुंबई/नागपूर . ( लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता )

३९.अप्पर संचालक, एकात्मिक ग्रामीण विकास कक्ष,

४०.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.

४१.निवासी लेखापरीक्षा, अधिकारी, मुंबई.

४२.जिल्हा कोषागार अधिकारी, सर्व.

४३.नियोजन विभाग / वित्त विभाग, मंत्रालय , मुंबई

४४.सर्व अशासकीय सदस्य महाराष्ट्र राज्य जलसंधारण सल्लागार परिषद.

४५.सर्व उपसचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी,ग्राम विकास व जलसंधारण विभाग.

४६.जल-8 (निवडनस्ती) ग्रा.वि.व ज.सं.विभाग, मंत्रालय,मुंबई .

# प्रपत्र – अ

**शासन निर्णय क्रमांक :मफुअ-२०१३/प्र. क्र. ३७ /जल-८, दिनांक १६ डिसेंबर,२०१३ चे सहपत्र.**

१. नाव व संपूर्ण पत्ता (दूरध्वनी क्रमांक) -

२. तालुका-

३. जिल्हा-

४. कार्यक्षेत्र-

५. पासपोर्ट आकाराचे दोन फोटो -

६. व्यक्तीगत स्वरुपाचा पुरस्कार असल्यास चारित्र्याचा दाखला -

७. पुरस्कार निवडीचे निकष-

**अ. व्यक्ती :-**

१. १८ ते ६० वर्षातील असावी.

२. स्व:ताच्या पडीक जमिनीवर सीसीटी, ओघळीवर ओघळ नियंत्रण, वृक्ष लागवड इत्यादी उपचार केलेले असावेत.

३. स्व:ताच्या जमिनीवर बांधबंधिस्ती करुन कोरडवाहू शेतीचा विकास केलेला असावा.

४.मुलस्थानी जलसंधारण, विहीर पुनर्भरण, श्रमदानातून वनराई बंधारे आणि जलस्त्रोतातील गाळ टाकून जमीन लागवडीखाली आणलेली असावी.

५. कमी पाण्यामध्ये जास्तीत जास्त उत्पादन घेणा-या पध्दतीचा स्विकार केलेला असावा.

६. शेततळे अथवा इतर कोणत्याही पध्दतीची उपचार पध्दत अंगीकरलेली असावी.

७. जलसंधारण विभागामार्फत अयोजित परिसंवादात सहभाग नोंदीवलेला असावा.

८. जलसंधारण विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या योजनेंतर्गत सक्रिय सहभाग असावा.

९. जलसंधारण कामात पारितोषिक / पुरस्कार प्राप्त झालेला असावा.

१०. पिण्याच्या पाण्याच्या उद्भव वाढीसाठी व शेतीच्या पाण्याची काटकसर करण्यासाठी प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून जन जागृती केलेली असावी.

११. एकदा पुरस्कार दिल्यानंतर सदर व्यक्तीचा पुढील ०५ वर्षाकरीता पुरस्कारासाठी विचार

करण्यात येवु नये.

१२. पुरस्कारास पात्र ठरलेली व्यक्ती गुन्हेगार प्रवृतीची असू नये.

१३. पुरस्कार प्राप्त व्यक्तीची नावे / संस्थेचे नाव कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करावीत.

**ब) संस्था :-**

१. संस्था नोंदणीकृत असावी.

२. मृद व जलसंधारण कामाचा किमान ५ वर्षाचा अनुभव असावा.

३. कायमस्वरूपी तांत्रिक मनुष्यबळ असावे.

४. लेखा परिक्षण झालेले असावे.

५. लोकसहभागाद्वारे कामे केल्याची नोंद असावी.

६. विकास निधीच्या माध्यमातून / लोकसहभागातून जलस्त्रोतांची देखभाल, दुरूस्ती सारखी कामे केलेली असावी.

७. संस्थेच्या मालकीच्या जमीनीवर मृद व जलसंधारणाची प्रेरणादायी कामे जनतेस खुली केलेली असावीत

८ भूमिहीनासाठी उपक्रमाद्वारे उपजिवीकेचे कायम स्वरूपी साधन निर्माण करुन दिलेले असावे.

९. सामूहिक क्षेत्रावर वृक्ष लागवड व त्याचे संवर्धन, पिण्याच्या पाण्याच्या उद्भव वाढीसाठी व शेतीच्या पाण्याची काटकसर करण्यासाठी प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून जन जागृती केलेली यशोगाथा असावी.

१०. महिलांचा सहभाग असावा.

११. संस्थेचा काळया यादीत समावेश झालेला नसावा.

**क) सामुदायिक स्वरूपाचे परस्कार :-**

**गाव / पाणलोट समिती / ग्रामपंचायत / युवक मंडळ /गट**

१. विविध योजनेतून मिळालेल्या निधीचे लेखा परिक्षण झालेले असावेत व अभिलेख अद्ययावत असावते.

२. ग्राम पंचायत क्षेत्राचे वॉटर बजेटींग केलेले असावेत.

३. सार्वजनिक व वैयक्तिक विहीरींचे पुर्नभरण केलेले असावेत.

४. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी अंतर्गत मृद व जलसंधारणाची कामे करून जास्तीत जास्त मनुष्य दिवस निर्मिती केलेली असावी.

५. केलेल्या कामांचे सामाजिक अंकेक्षण केलेले असावी.

६. मृद व जलसंधारणाच्या कामामध्ये लोकसहभाग असावा.

७. सामुहिक क्षेत्रावर वृक्ष लागवड व संवर्धन केलेले असावेत.

८. झालेल्या उपचारांची देखभाल व दुरूस्ती केलेली असावे.

९. पाणी पुरवठयांच्या स्त्रोंताचे बळकटीकरण केलेले असावे.

१०. पारितोषिक व पुरस्कार प्राप्त झालेला असावा.

११. युवकांचा गट असल्यास तो नोंदणीकृत असावा.

१२. स्थापन केलेला गट हा कायमस्वरूपी असावा व नियमित बैठका झालेल्या असाव्यात.

१३. गटामध्ये सर्वसमावेशक प्रतिनिधींचा (अनु.जा/जमाती/अल्प/अत्यल्प व महिला) समावेश असावा.

१४. गटाच्या कार्यक्षेत्रात भुजलांतील पाण्याची पातळी वाढण्याचे दृष्टीने विविध उपचार (विहीर पुर्नभरण, वनराई बंधारे, मुलस्थानी जलसंधारण) लोकसहभागातून व श्रमदानातून राबविलेले असावेत.

१५. कृषि विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध उपक्रमामध्ये सहकार्य भावनेतून सहभाग असावा.

# प्रपत्र — ब

**शासन निर्णय क्रमांक :मफुअ-२०१३/प्र. क्र. ३७ /जल-८, दिनांक १६ डिसेंबर,२०१३ चे सहपत्र**

**अधिकारी / कर्मचारी यांचे निवडीचे निकष :-**

१. सेवा कालावधी किमान ५ वर्षे असावा.

२. मृद व जलसंधारणबाबतचे प्रशिक्षण झालेले असावे.

३. मृद व जलसंधारणाचे कामे करताना लोक सहभाग मिळविण्याच्यादृष्टीने सक्षम असावा.

४. कामे करताना उद्योगप्रियता, कार्यतत्परता तसेच इतरांशी सौज्यन किंवा सहकार्याचे संबंध ठेवणारा असावा.

५. मृद व जलसंधारणाची कामे करताना निर्णय शक्ती, उपक्रमशिलता यासह कार्यक्षम असावा.

६. उत्कृष्ट कामे केल्यासंदर्भात यशोगाथा प्रसिध्द केलेल्या असाव्यात.

७. कृषि विभागामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध प्रशिक्षणात व चर्चासत्रात सक्रीय सहभाग असावा.

८. सेंद्रिय शेती, शेतकरी मासिक, मृद व पाणी परिक्षण इ. उपक्रमात लोकसहभाग वाढविण्याचेदृष्टीने प्रयत्न केलेले असावेत.

९. स्वत:चे कल्पकतेतून नाविन्यपूर्ण बाबींचा उपक्रम राबविलेला असावा.

१०. अधिकारी/कर्मचारी यांच्या पुढाकाराने एखादया गावाचा पिण्याच्या पाण्याचा किंवा शेतीच्या पाण्याचा पूर्णत: किंवा अंशत: सुटलेला असावा.